INSTITUTE OF RESEARCH & TRAINING
LIBRARY
Acc. No.........
BOMBAY-21

(फक्त कार्यालयीन उपयोगासाठी)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण विभाग

# महाराष्ट्र राज्यातील "धोबी" समाजाच्या अस्पृश्यतेसंबंधी सामाजिक स्थितीचा अभ्यास

# अभ्यास अहवाल

रामदास पाटील
संचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, राणीचा बाग, पुणे ४११ ००१.
(समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)

नोव्हेंबर १९९६.

[फक्त कार्यालयीन उपयोगासाठी]

महाराष्ट्र शासन.

समाज कल्याण विभाग.

# महाराष्ट्र राज्यातील "धोबी" समाजाच्या अस्पृश्यतेसंबंधी सामाजिक स्थितीचा अभ्यास.

अ भ्या स अ ह वा ल.

रामदास पाटील

संचालक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,

२८ राणीचा बाग, पुणे- ४११ ००१.

[समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे]

नोव्हेंबर १९९६.

## अभ्यास अहवाल

### महाराष्ट्र राज्यातील "धोबी" समाजाचा अस्पृश्यतेसंबंधी सामाजिक स्थितीचा अभ्यास.

[ अ नु क्र म णि का ]


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ ते २ |
| २. | प्रास्ताविक व उद्देश | ३ ते ४ |
| ३. | व्यवसाय/शिक्षण/अस्पृश्यता व मंदीर प्रवेश -सामाजिक स्थिती | ५ ते ७ |
| ४. | विवरण पत्र "अ". | ८ |
| ५. | धर्म/पोटजात/पर्यायी जात व मातृभाषा विषयक स्थिती. | ९ ते १० |
| ६. | विवरणपत्र "ब". | ११ |
| ७. | अस्पृश्यताबाबत निर्बंध, जेवणाची पंगत व मृतविधीबाबत स्थिती. | १२ ते १३ |
| ८. | विवरणपत्र - "क" | १४ |
| ९. | पोलिस तक्रार/वस्ती/मुलांचे शिक्षण व वंशपरंपरागत व्यवसाय. | १५ ते १६ |
| १०. | विवरणपत्र "ड" | १७ |
| ११. | आर्थिक परिस्थिती व लग्न समारंभा बाबतची स्थिती. | १८ |
| १२. | विवरण पत्र "इ". | १९ |
| १३. | पृथ:करण. | २० ते २१ |
| १४. | निष्कर्ष. | २२ ते २३ |
| १५. | सर्वेक्षण अहवाल प्रपत्र | २४ ते २६ |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था.

## २८ राणीचा बाग, पुणे-१.

महाराष्ट्र राज्यातील "धोबी" समाजाच्या अस्पृश्यतेसंबंधी सामाजिक स्थितीचा अभ्यास.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील "धोबी" समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती लागू करण्याबाबत या समाजाच्या निरनिराळ्या संघटनांनी महाराष्ट्र शासनाकडे मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात वास्तव्यास असलेल्या धोबी समाजाला अस्पृश्यतेसंबंधी सामाजिक स्थितीचा नुमुना पाहणी सर्वेक्षण करुन संशोधनात्मक अभ्यास करण्याकरीता समाज कल्याण विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेस सूचना देण्यात आल्या. त्यानुसार श्री. रामदास पाटील, संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी हा अभ्यास अहवाल नमुना सर्वेक्षण/परिश्रमपूर्वक करुन पूर्ण केलेला आहे.

"धोबी" या जातीला इतर अनुसूचित जातीप्रमाणे अस्पृश्यतेचा निकष लावून अनुसूचित जातीच्या सवलती अनुसूचित जाती प्रमाणे देता येवू शकेल. किंवा कसे यांची पडताळणी पाहण्यासाठी या अभ्यास अहवालामध्ये वेगवेगळ्या प्रकारची मानके सर्वेक्षण अहवालामध्ये विचारात घेऊन हा अभ्यास अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

सदर अहवाल तयार करण्याचे कामी श्री. अ. मा. पवार [भाप्रसे] माजी संचालक, समाज कल्याण यांचेसुध्दा मार्गदर्शन लाभले आहे. तसेच सर्व विभागीय व जिल्हा समाज कल्याण अधिकारी त्यांच्या अधिनस्त असलेले निरीक्षक यांनी नमुना सर्वेक्षण करण्याकरीता संस्थेस सहकार्य केलेले आहे.

सर्वेक्षण अहवालाची छाननी, माहितीची जुळवणी, पृथ:करण विश्लेषण व लिखाण करण्यासाठी श्री. डि. एस. चोपकर, सहाय्यक-प्राध्यापक, श्रीमती एस. डी. कन्हेरकर, निबंधक, श्री. संजय रणपिसे, कनिष्ठ लिपीक, श्री. सुरेश ठमके, ग्रंथपाल तसेच श्रीमती जे. आर. निर्मल,

 •२•

लघुलेखक यांचे मोलाचे सहकार्य सदर अभ्यास अहवाल पूर्ण करण्यास्तव प्राप्त झालेले आहे.

सदर अहवालाचा उपयोग हा सर्व क्षेत्रात अभ्यासाकरीता उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

पुणे.

दिनांक : २५/११/९६

(सतीश गवई)
संचालक,
समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

.....

## प्रास्ताविक व उद्देश :

समाजातील जातीभेद, वर्णभेद व जाती व्यवस्थेत विभिन्न जातींना वेगवेगळ्या गटातीत अंतर्भूत करून त्या गटातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय जाती तसेच सवर्ण जाती इ. प्रकारचे ठळक वर्गीकरण झाल्याचे निदर्शनास येते.

मागासवर्गीय अनुसूचित जाती व मागासवर्गीय अनुसूचित जमाती या जातीच्या संदर्भाने भारत सरकारने विभिन्न कसोटया परीक्षा घेऊन व खात्री केल्यानंतरच परिशिष्ठ प्रकाशित केले आहे. त्या परिशिष्ठातील अनुसूचित जाती व त्यातील तत्सम अनुसूचित जाती या सर्वांचा समावेश अनुसूचित जाती या संवर्गात करून अनुसूचित जाती हे एक स्वतंत्र परिशिष्ठ नेमण्यात आलेले आहे. या अनुसूचित जातीच्या सवर्गात एकूण ५९ प्रमुख जाती व उपजाती नमूद करण्यात आलेल्या आहेत. सदरची यादी ही भारत सरकारचे प्रथम परिशिष्ठ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आदेश [सुधारीत] अधिनियम १९७६ [१०८]/१९७६] नुसार प्रकाशित करण्यात आलेली आहे.

समाजातील मागासवर्गीय व्यक्ती हया सर्वसाधारणपणे समाजाची सेवा करण्याचे संदर्भात कामे करीत असतात. "धोबी" ही एक जात अशीच मागासवर्गीय जातीमधील एक आहे. ही जात महाराष्ट्रात स्थापित होण्यापूर्वी मध्यप्रांत [मध्यप्रदेश] या राज्यात समाविष्ट होती. त्या वेळेस वेगवेगळया जाती जमातीच्या संदर्भातील बाबी हया भारत सरकार "भारत सरकार राजपत्र" एप्रिल १५, १९५० मधील पार्ट-२, सेक्शन ३ मध्ये मध्यप्रदेश सरकारने प्रकाशित केलेल्या होत्या. त्यामध्ये धोबी ही जात तत्कालिन परिस्थितीनुसार वेगवेगळ्या जिल्हयात अनुसूचित जातीचे अनुषंगाने मागासवर्गीय समजण्यात येत होती असे निदर्शनास येईल. परंतु प्रत्यक्षात या जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या इतर समाजाप्रमाणे अनुसूचित जातीमध्ये होतो किंवा नाही हे पडताळून पहाण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची मानके विचारात घेऊन व त्यानुसार सर्वेक्षण करून त्यातील निष्कर्ष काढणे आवश्यक ठरले आहे. धोबी समाजातील आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या व्यक्तींसंबंधी तसेच या समाजामध्ये अस्पृश्यता पाळली जाते किंवा नाही या बाबी प्रकर्षाने विचारात घेऊन या जातीच्या व्यक्तींना

अनुसूचित जातीमध्ये समाविष्ठ करुन सुविधा उपलब्ध करुन देणे योग्य असल्याबाबतचे निवेदनात समाजातील विविध घटकांनी सादर केले आहे. शासनाने या संदर्भात सदर धोबी जात ही अनुसूचित जातीच्या संवर्गात समाविष्ठ होऊ शकेल किंवा कसे याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या माध्यमातून व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या प्रत्यक्ष तपासणीमधून अहवाल प्राप्त करुन घेऊन त्याचे सर्वेक्षण करण्याचे व सदरची जात ही प्रत्यक्षात मागासवर्गीय अनुसूचित जाती मध्ये मोडत असल्यास त्या अनुषंगाने माहितीचे संकलन करण्यासंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी संस्थेवर टाकली आहे.

"धोबी" ही जात इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ठ आहे. हया जातीला परीट किंवा धोबी असे पर्यायी शब्द वापरले जातात व ही जात महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासलेल्या जाती या संवर्गात १२५ कलमाखाली नमूद करण्यात आलेली आहे. या जातीच्या व्यक्तींनी धोबी जातीचा समावेश अनुसूचित जातीत करावा अशी मागणी केली असली तरी प्राध्यापक आर. के. मुटाटकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीकडे पाठविण्यात आलेली होती. या समितीने सुध्दा धोबी जातीबाबत भारतीय संस्कृती कोषखंड ४था, पान क्र. ६२५ व परिशिष्ठ २ बाबत भारतीय संस्कृति कोषखंड ५वा, पान क्र. ४३९ मध्ये नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यात धोबी जातीबाबत अस्पृश्यता पाळली जात नाही. धोबी जातीचे लोक हे महार, मांग, चांभार इ. पुर्वास्पृश्य व्यक्तींचे कपडे धुवत नाहीत. धोबी लोकांना परिट या पर्यायाने जातीवाचक शब्दानेसुध्दा संबोधाले जाते. अशा परिस्थितीत सदरची जात व या जातीची विभिन्न लक्षणे विचारात घेता या जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करता येईल काय ? याचा विचार सदरच्या अहवालामध्ये करण्यात आलेला आहे.

सामाजिक स्थिती :

विवरण पत्र "अ" चे अवलोकन केले असता धोबी समाजाची स्पृश्य/अस्पृश्यता बाबतची तसेच मंदीर प्रवेशाबाबतची बाब खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. सर्वसाधारणपणे समाज व्यवस्थेतील सवर्ण, अस्पृश्य समाजातील व्यक्तींच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास केला असता, समाजामध्ये सवर्ण लोक या समाजाला अस्पृश्य समजतात काय याचा सुध्दा आढावा घेण्यात आला. या आढाव्यातून असे निदर्शनास आले की, ८०७ कुटूंबापैकी फक्त ७० कुटूंबांशी समाजातील सवर्ण लोक इतर अनुसूचित जातीतील व्यक्तीं प्रमाणे अस्पृश्यता पाळतात असे स्पष्ट केले आहे. सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, ही बाब सर्वसाधारण राज्यात समर्थनीय ठरत नाही, याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देता येईल.

अस्पृश्यता :

अ] नाशिक विभागात, एकूण १०० कुटूंबाचे सर्वेक्षण घेतले असता त्यामध्ये ८९ हिंदू कुटूबे असून, ११ मुस्लिम कुटूबे आहेत. या १०० कुटूंबापैकी फक्त ४ कुटूंबामध्ये अस्पृश्यता पाळली जाते असे निदर्शनास आले असले तरी अस्पृश्यतेची तीव्रता ही नगण्य आहे. हिंदीभाषिक व्यक्ती सामाजिक बंधनात राहून पूजा-पाटच्या बाबतीत अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे ही परिस्थिती दिसून येत आहे.

ब] मुंबई विभागात अस्पृश्यता पाळणारे एकही कुटूंब नाही. पुणे विभागात १३९ कुटूंबापैकी फक्त १२ कुटूंबांमध्ये अस्पृश्यता पाळली जाते असे नमूद केले असले तरी हे प्रमाण एकूण कुटूंब संख्येच्या केवळ ८. टक्के आहे. त्यामुळे ही बाब सुध्दा नगण्य आहे. औरंगाबाद विभागात एकूण १८२ कुटूंबापैकी फक्त १३ कुटूंबामध्ये अस्पृश्यता पाळली जाते असे निदर्शनास येते. परंतु प्रत्यक्षात सुक्ष्म निरीक्षण केले असता, परदेशी या जातीची कुटूबे आहेत ती समाजातील इतर जातींच्या व्यक्तींबरोबर सहसा कमी संबंध ठेवतात आणि त्यामुळे फक्त १३ कुटूंबे ही अस्पृश्यता पाळतात असे म्हणता येणार नाही. नागपूर व अमरावती विभागात अनुक्रमे २४ व १७ अशी ४१ कुटूंबांमध्ये अस्पृश्यता पाळली जात असल्याची शक्यता असली तरी त्यांच्या कुटूंबांची टक्केवारी ही अनुक्रमे १८.३ व १४.० अशी येते. अस्पृश्यता पाळली जाणाऱ्या कुटूंबांची टक्केवारी ही फारच कमी असल्यामुळे व इतर विभागातील स्थिती ही निरीक्षणाअंती प्रत्यक्षात निदर्शनास येत नाही.

एकंदरीत महाराष्ट्रातील ८०७ कुटूंबापैकी अस्पृश्यता पाळली जात नाही

असे म्हणणारी ७३७ कुटूंबे असून त्यांची टक्केवारी ९१.३२ आहे. सर्व साधारणपणे मत व्यक्त करणारी कुटूंबे ही अस्पृश्यता पाळली जात नाही या मताची असल्यामुळे सदरचा समाज हा सवर्णांकडून अस्पृश्य समजला जात नाही असे म्हणण्यास भरपूर वाव आहे. त्यामुळे धोबी समाज हा सवर्ण व्यक्तींच्या बरोबरीनेच समाजातील इतर सर्व बाबींशी निगडीत आहे असे म्हणता येईल.

मंदीर प्रवेशाबाबतची स्थिती :

विवरणपत्र "अ" चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, एकूण ८०७ कुटूंबाच्या सर्वेक्षणामध्ये ७०७ कुटूंबांना मंदीरप्रवेश हा मुक्त आहे असे सांगण्यात आलेले आहे. मुक्त मंदीर प्रवेश करणाऱ्या कुटूंबांची टक्केवारी ही ९६.२८ आहे. त्याचे आचार, विचार रुढी परंपरा हया सवर्ण व्यक्तींप्रमाणेच निगडीत आहेत. त्यामुळे केवळ ४% व्यक्ती हया मंदीर प्रवेश करीत नाहीत असे जरी म्हणत असल्यातरी मंदीर प्रवेशाबाबत प्रत्येकाची वैयक्तिक भूमिका खालीलप्रमाणे राहू शकेल.

अ] आपण मंदीरात गेल्यानंतर इतर व्यक्ती काय म्हणतील अशाप्रकारे मनात चलबिचल असल्याची भावना असल्यामुळे ते मंदिरात जात नाहीत.

ब] मंदीर प्रवेश केल्यानंतर आपल्याला कोणी मारतील किंवा हाकलून देतील अशी भिती मनात असल्यामुळे ते मंदिर प्रवेश करण्याचे टाळतात.

क] ग्रामीण भागात सुशिक्षित पिढीतील व्यक्ती हया प्रत्यक्ष मूर्तीपूजा न करता बाहेरुनच गाभारातील देवाला मनातून नमस्कार करुन निघून जातात, याचा अर्थ मंदीर प्रवेश नाही असा होत नाही.

ड] सुशिक्षित पिढीतील व्यक्ती हया सर्वसाधारणपणे त्यांच्या दैनंदिन कामात इतक्या व्यस्त असतात की त्यांना मंदीरात जाण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध होत नाही त्यामुळे याबाबतीत त्यांच्या वैयक्तिक इच्छेचा प्रश्न निगडीत असतो.

यावरुन असे दिसून येईल की, मुक्त मंदीर प्रवेश ही बाबच प्रामुख्याने धोबी या समाजात आढळून येईल. कोणत्याही परिस्थितीत हा समाज अस्पृश्य आहे असे गृहीत धरुन त्यांना मंदीर प्रवेशासाठी कोणीही मनाई केलेली नाही.

व्यवसाय : विवरणपत्र "अ"नुसार धोबी समाजातील व्यवसायाचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ८०७ कुटुंबापैकी ६८६ कुटुंबे ही कपडे धुण्याचा पारंपारिक व्यवसाय करीत असून ६६ कुटुंबे नोकरी व्यवसायात व ५२ कुटुंबे ही अन्य व्यवसायात [शेती, व्यापार व इतर] आहेत. पारंपारिक व्यवसाय, नोकरी करणा-यांची संख्या व अन्य व्यवसाय करणा-या कुटुंबाची स्थिती पुढीलप्रमाणे निदर्शनास येते.

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | कुटुंबाची संख्या | एकूण कुटुंब संख्येची टक्केवारी. |
|---|---|---|---|
| १. | पारंपारिक व्यवसाय [धोबी/कपडे धुण्याचा व्यवसाय]. | ६८६ | ८५ |
| २. | नोकरी | ६६ | ८.१७ |
| ३. | अन्य व्यवसाय | ५२ | ६.४ |

५

वरील सर्वेक्षणावरून असे दिसून येईल की, धोबी समाजातील कुटुंबे ही जास्तीत जास्त प्रमाणात पारंपारिक व्यवसायामध्ये कार्यान्वित आहेत. नोकरी करणा-यांचे प्रमाण हे ८.१७ अत्यल्प असून अन्य व्यवसाया कडे ही कुटुंबे ६.४ या प्रमाणातच असल्याचे दिसून येते.

शिक्षण : धोबी समाजामधील ८०७ कुटुंबांच्या सर्वेक्षण अहवालावरून असे निदर्शनास येते की, हा समाज शैक्षणिक दृष्टया फार मोठया प्रमाणात मागासलेला आहे. त्याची वर्गवारी व टक्केवारी खालीलप्रमाणे विवरणपत्र "अ" नुसार दिसून येते.

| अ. क्र. | शैक्षणिक इयत्ता | कुटुंबाची संख्या | टक्केवारी. |
|---|---|---|---|
| १. | निरक्षर | १५३ | १८.९५ |
| २. | १ ते ४थी | १३६ | १६.८ |
| ३. | ५वी ते ८वी | २२५ | २७.८८ |
| ४. | ९वी ते १०वी | २०४ | २५.२७ |
| ५. | एस. एस. सी. पुढे | ८९ | ११.०२ |

वरील टक्केवारीवरून असे दिसून येईल की, एस.एस.सी व त्यापुढे पदवीधर पर्यंत शिक्षण झालेले कुटुंब प्रमुख ही फक्त ११.०२ या प्रमाणात असल्याचे दिसून येईल. तसेच निरक्षर असणा-यांचे प्रमाण हे १८.९५ असल्याचे निदर्शनास येते. यावरून हा समाज शैक्षणिकदृष्टया मागासलेला आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण कुटुंबे | व्यवसाय | | | | शिक्षण | | | | अस्पृश्यता | | मंदीर प्रवेश | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वं-शंद धोबी | नोकरी | अन्य | निरक्षर | ४थी | ८वी | १०वी | एसएससी पुढे | होय | नाही | होय | नाही |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. |
| १. | मुंबई विभाग | १३१ | ८९ | २३ | १९ | १८ | १७ | ४७ | ४३ | ६ | – | १३१ | १३१ | — |
| २. | पुणे विभाग | १३९ | १२२ | ९ | ८ | १२ | १८ | ४७ | ४४ | १८ | १२ | १२७ | १३९ | — |
| ३. | नाशिक विभाग | १०० | ८७ | ११ | २ | ११ | २८ | २४ | १६ | २१ | ४ | ९६ | १०० | — |
| ४. | औरंगाबाद | १८२ | १७७ | २ | ३ | ६२ | २५ | २८ | ४३ | २४ | २३ | १६९ | १६९ | १३ |
| ५. | नागपूर विभाग | १३४ | ११७ | १० | ७ | ३७ | २५ | ४० | २९ | ३ | २४ | ११० | १३४ | — |
| ६. | अमरावती विभाग | १२१ | ९४ | ११ | १३ | १३ | २३ | ३९ | २९ | १७ | १७ | १०४ | १०४ | १७ |
| | एकूण | ८०७ | ६८६ | ६६ | ५२ | १५३ | १३६ | २२५ | २०४ | ८९ | ७० | ७३७ | ७७७ | ३० |

## धर्म/पोटजात/पर्यायी जात व मातृभाषाविषयक स्थिती.

**धर्म :** विवरणपत्र "अ" च्या रकाना क्र. ३ मधील माहितीचे अवलोकन केले असता एकूण ८०७ कुटुंबे अशी आहेत की, त्या कुटुंबामध्ये हिंदूधर्मीय धोबी समाजाचे ७९६ कुटुंबे व मुस्लीमधर्मीय फक्त ११ कुटुंबे आहेत.

महाराष्ट्रात मुस्लीमधर्मीय धोबी समाजाचे ११ कुटुंबे ही केवळ नाशिक विभागात आहेत, उर्वरित मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर व औरंगाबाद या विभागात मुस्लीम धर्मीय धोबी समाजाच्या व्यक्तींचा सर्वेक्षणामध्ये अंतर्भाव नाही.

रकाना क्र. ३ मध्ये औरंगाबाद विभागात १८२ कुटूंबे, पुणे विभागातील १३९ कुटूबे, नागपूर विभागातील १३४, मुंबई विभागातील १३१ व अमरावती विभागातील १२१ आणि नाशिक विभागातील १०० अशी एकूण ८०७ कुटूबे दर्शविण्यात आलेली आहेत.

**पोटजात :** धोबी या मुख्य जातीला विभिन्न तत्सम जाती म्हणजेच धोबी, परीट, परदेशी, पडवळ, वठ्ठी, ते. धोबी, मु. धोबी अशा नांवाने संबोधले जाते. जातीच्या नांवानुसार ओळखल्या जाणा-या कुटुंबांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जातीचे नांव | एकूण कुटुंबे | टक्केवारी. |
|---|---|---|---|
| १. | धोबी | ३१२ | ३८.६६ |
| २. | परीट | ३९५ | ४८.९४ |
| ३. | परदेशी | ८३ | १०.२ |
| ४. | पडवळ | ३ | ०.३ |
| ५. | वठ्ठी | ६३ | ७.८ |
| ६. | ते. धोबी | १८ | २.२ |
| ७. | मु. धोबी | १३ | १.६ |

**पर्यायी जात :** सदर धोबी जातीमध्ये मुख्यत: तीन पर्यायी जाती असून ती विवरणपत्र मध्ये क्रमांक १३,१४,१५ वर दर्शविलेली आहेत. त्यानुसार कुटुंबाच्या संख्येनुसार सुध्दा पर्यायी जातीचे विवरण खालीलप्रमाणे देता येईल.

| अ.क्र. | पर्यायी जातीचे नांव | कुटूंबाची संख्या | एकूण कुटुंबाच्या संख्येची टक्केवारी. |
|---|---|---|---|
| १. | परीट | ७१५ | ८८.६० |
| २. | लिंगायत | ३४ | ४.२ |
| ३. | परदेशी | ५८ | ७.२ |

पर्यायी जात :

वरील विवेचनावरून धोबी जातीच्या विभिन्न तत्सम जाती तसेच पर्यायी जाती यामध्ये असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रामध्ये धोबी, परीट, परदेशी धोबी, पडवळ, वठ्ठी, तेलंगी, धोबी, मुस्लिम धोबी ह्या सात तत्सम जाती असल्याचे निदर्शनास येते. धोबी व परीट ह्या तत्सम जाती महाराष्ट्रात सर्वत्र असल्याचे निदर्शनास येते. पडवळ ही जात कोकण विभागात तर वठ्ठी ही तत्सम जात विदर्भ व मराठवाडा विभागात तर परदेशी ही जात महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेल्या कमी प्रमाणात आढळून येते. मुस्लिम धोबी हे प्रामुख्याने खानदेशाी विभागात तर लिंगायत धोबी ही पश्चिम महाराष्ट्रात असल्याचे निदर्शनास येते.

सर्वेक्षणामध्ये धोबी या जातीला पर्यायी जात कोणती याबाबत सर्वेक्षण केले असता, परिट हीच जात प्रामुख्याने सांगण्यात आलेली आहे. व त्याचे प्रमाण ८८.७ % असल्याचे निदर्शनास येते. परदेशी ७.२ व लिंगायत ४.२ या प्रमाणात पर्यायी जात सर्वेक्षणामध्ये निदर्शनास येते.

मातृभाषा :

महाराष्ट्राच्या सर्व विभागातील धोबी समाजाचे सर्वेक्षण केलेल्या एकूण ८०७ कुटूंबापैकी ७०० कुटूंबातील व्यक्तींची मातृभाषा ही मराठी असून १०७ कुटूंबांची मातृभाषा ही हिंदी आहे. सर्वेक्षणातील ८०७ कुटूंबापैकी मराठी भाषा बोलणाऱ्यांची टक्केवारी ही ८६.७५ असून हिंदी भाषा बोलणाऱ्यांची टक्केवारी ही १३.२५ आहे. यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्रामध्ये वास्तव्यात असणाऱ्या या समाजातील लोक हे मराठी भाषिक आहेत. या कुटूंबातील त्यांची मातृभाषा ही हिंदी आहे. अशी कुटूंबे ही प्रामुख्याने परदेशी धोबी किंवा लिंगायत धोबी व मुस्लिम धोबी या मधील असून ही कुटूंबे अन्य प्रांतातून महाराष्ट्रामध्ये स्थलांतर झाल्याचे निदर्शनास येते.

## वि व रण प त्र - "ब"

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण कुटुंबे | धर्म हिंदू | धर्म मुस्लिम | पारंपारिक जात धोबी | परीट | परदेशी | पडवळ | वठ्ठी | ते. धोबी | म. धोबी | पर्यायी जात परीट | लिंगायत | परदेशी | मातृभाषा मराठी | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. |
| १. | मुंबई विभाग | १३१ | १३१ | – | ३२ | ९० | ६ | ३ | – | – | – | १२१ | ७ | ३ | ११२ | १९ |
| २. | पुणे विभाग | १३९ | १३९ | – | ५ | १२४ | ४ | – | – | ६ | – | १२१ | १३ | ५ | १३३ | ६ |
| ३. | नासिक विभाग | १०० | ८९ | ११ | २ | ७३ | १४ | – | – | – | ११ | ९३ | २ | ५ | ७७ | २३ |
| ४. | औरंगाबाद | १८२ | १८२ | – | ११५ | ४९ | ९ | – | ४ | ३ | २ | १७० | – | १२ | १६८ | १४ |
| ५. | नागपूर विभाग | १३४ | १३४ | – | १०५ | ३९ | २० | – | ३९ | १ | – | ११४ | १ | १९ | १०७ | २७ |
| ६. | अमरावती | १२१ | १२१ | – | ५३ | २० | २० | – | २० | ८ | – | ९६ | ११ | १४ | १०३ | १८ |
| | एकूण | ८०७ | ७९६ | ११ | ३१२ | ३९५ | ८३ | ३ | ६३ | १८ | १३ | ७१५ | ३४ | ५८ | ७०० | १०७ |

विवरणपत्र "क" चे अवलोकन केले असता, धोबी समाजातील सर्वेक्षण केलेल्या ८०७ कुटूंबापैकी ७४१ कुटूंबांना त्यांच्या इतर वर्गीय सवर्ण व मागासवर्गीय व्यक्तींच्या कुटूंबाचे कोणतेही निर्बंध नाहीत असे सर्वेक्षण अहवालावरुन निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे सदरची जात ही कोणत्याही प्रकारे दुर्लक्षित झालेली नाही असे दिसून येते.

विवरणपत्र "क" मध्ये पुणे विभागात एकूण १३९ कुटूंबापैकी फक्त ५, औरंगाबाद विभागात १७, नागपूर विभागात २३, अमरावती विभागात १७, अशा एकूण ६२ [बासष्ट] कुटूंबांचे मुलाखातीमध्ये त्यांच्या जाती जमातीसाठी वेगळी पंगत केली जाते असे सांगण्यात आलेले आहे.

ही बाब सत्य आहे,असे गृहीत धरले तरी अशाप्रकारचा जेवणाची वेगळी पंगत घेण्याची प्रथा [स्पृश्य/अस्पृश्य] भेदभाव मानणारे आज तरी अस्तित्वात नाही असे वेळोवेळी जिल्ह्यातून प्राप्त झालेल्या दक्षता समितीच्या अहवालांवरुन दिसून येते. अशी प्रथा जर अद्याप चालू असती तर वेगळ्या पंगतीची बाब त्वरीत निदर्शनास आली असती व या संबंधाने योग्य ती कार्यवाही शासनाने नियमान्वये केली गेली असती. वेगळी पंगत केली जात नाही असे ७४५ कुटूंबांनी मुलाखातीच्या वेळेस सांगितल्यामुळे वेगळी पंगत नसल्याबाबतची पुस्ती या बाबीस मिळते.

सामाजिक विधी.

हिंदू समाजात सर्वसाधारणपणे व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्यास स्मशान भूमीत नेऊन जाळण्यात येते. या आधारावर संबंधित धोबी कुटूंबाचे सर्वेक्षण केले असता, ८०७ कुटूंबापैकी ७४३ कुटूंबांनी मृत व्यक्तीचे अंत्यविधी हे प्रेतजाळून केले जाते असे नमूद केले आहे. यावरुन धोबी समाजातील सर्व विधी ह्या हिंदू समाजातील सवर्ण व्यक्तींच्या चालिरिती प्रमाणेच पाळल्या जातात असे दिसून येईल.

विवरणपत्र क चे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, ८०७ कुटूंबापैकी ७४१ कुटूंबांनी अस्पृश्यतेबाबत काहीही निर्बंध नाहीत असे सर्वेक्षण अहवालावरुन निदर्शनास आलेले आहे. फक्त ६६ कुटूंबांनी अस्पृश्यता विषयक निर्बंध आहेत अशी उत्तरे दिलेली दिसून येतात. मुंबई व नाशिक विभागात निर्बंध नाहीत, पुणे विभागात ८, औरंगाबाद विभागात १३, नागपूर विभागात २८ व अमरावती १७ अशी एकूण ६६ उत्तरे ही निर्बंध असल्याबाबत अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. निर्बंधाचे स्वरुप

त्यामध्ये स्पष्ट करण्यात आलेले नाही.

धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात धोबी समाजातील व्यक्तींना जेवणावळीमध्ये वेगळी पंगत करुन जेवण देण्यात येते किंवा कसे याबाबत सर्वेक्षणामध्ये ७४५ अहवालामध्ये नाही अशी उत्तरे प्राप्त झालेली आहेत. त्याचे स्वरुप सुध्दा स्पष्ट करण्यात आलेली नाही.

धोबी समाजातील व्यक्तींचा मृत्यू झाल्यास त्याचा विधी कशात-हेने केला जातो, यामध्ये ७४३ अहवालांमध्ये मृत व्यक्तीस जाळण्यात येते असे निदर्शनास येते. फक्त ५९ उत्तरांमध्ये मृतदेह दफन केले जाते व ५ उत्तरांमध्ये अन्यविधी करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. हिंदू धर्मामधील सवर्ण व्यक्तीचे मृत देह हे त्या शरीराला अग्नी देवून पुर्ण केली जातात. त्याचप्रमाणे धोबी समाजातील अंत्यविधीसाठी मृत शरीरास अग्नी देवूनच विधी पूर्ण केल्याचे दिसून येते.

••••••

# वि व र ण प त्र "क"

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण कुटुंबे | निर्बंधा | | स्वस्म | | | भूगत वेगळी | | मुत विटी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | होय | नाही | | | | होय | नाही | दफण | जाळणे | अन्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १] | मुंबई विभाग | १३१ | .. | १३१ | .. | .. | .. | ~~१३१~~ | १३१ | .. | १३१ | .. |
| २] | पुणे विभाग | १३९ | ८ | १३१ | .. | .. | .. | ५ | १३४ | .. | १३९ | .. |
| ३] | नासिक विभाग | १०० | .. | १०० | .. | .. | .. | .. | १०० | १३ | ८७ | .. |
| ४] | औरंगाबाद विभाग | १८२ | १३ | १६९ | .. | .. | .. | १७ | १६५ | २२ | १५५ | ५ |
| ५] | नागपूर विभाग | १३४ | २८ | १०६ | . | .. | .. | २३ | १११ | २० | ११४ | .. |
| ६] | अमरावती विभाग | १२१ | १७ | १०४ | . | .. | . | १७ | १०४ | ४ | ११७ | .. |
| | एकूण | ८०७ | ६६ | ७४१ | .. | .. | .. | ६२ | ७४५ | ५९ | ७४३ | ५ |

पोलिस तक्रार/वस्ती/मुलांचे शिक्षण/व वंश परंपरागत व्यवसाय :

पोलिस तक्रार :

विवरणपत्र "ड" चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सवर्ण व मागासवर्ग यांमध्ये त्याची तक्रार पोलिसांत नोंदविली जाते. सर्वेक्षण केलेल्या ८०७ कुटूंबापैकी ८०५ कुटूंबांनी अस्पृश्यता विषयक अन्याय अत्याचार झाल्याबाबत अथवा भेदभाव झाल्याबाबत पोलिसात तक्रार केल्याचे दिसून येत नाही. फक्त औरंगाबाद विभागातील दोन अहवालांमध्ये पोलिसात तक्रार करण्यात आली असल्याचे दिसून येते. परंतु त्याचे स्वरुप स्पष्ट करण्यात आलेले नाही.

विवरणपत्र "ड" चे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, अस्पृश्यता या कारणावरुन व भेदाभेद या प्रकारातून कायद्याप्रमाणे तक्रारी केल्याचे दिसून येत नाही.

व्यसन : सर्वेक्षण अहवालात ८०७ कुटूंबापैकी ४०८ दारु पिणे, ८२ लोकांना अन्य व्यसन असल्याचे निदर्शनास येते व ३१७ लोकांना कुठलेही व्यसन नसल्याचे आढळून आले. यावरुन या समाजातील व्यक्ती दारु या व्यसनाकडे जास्त प्रमाणात आकर्षित झालेल्या आहेत असे निदर्शनास येते.

वस्ती : धोबी समाजातील लोक हे गावांमध्ये रहतात किंवा कसे याबाबत सर्वेक्षण अहवालामध्ये असे दिसून येते की, ८०७ कुटूंबापैकी ९६ कुटूंबे ही गांवाबाहेर राहत असून ६७ कुटूंबे सवर्ण वस्तीत व ६४४ कुटूंबे ही गांवाच्या मध्यवस्तीत राहतात. ८०७ कुटूंबापैकी फक्त ९६ कुटूंबे ही गावाबाहेर राहत असल्याचे निदर्शनास येते. गावांमधील ६४४ व सवर्ण वस्तीमधून ६७ व ७११ कुटूंबे ही सवर्ण समाजाच्या समुहात वास्तव्य करत असल्याचे निदर्शनास येते. सर्वसाधारण लोकांच्या वस्तीत राहणारे ८४% लोक असून इतर सवर्णांच्या वस्तीमध्ये राहणारे ११%० कुटूंबे असून तर गावांबाहेर राहणा-यांची टक्केवारी ही १५% एवढी येते.

शिक्षण घेणा-या मुलांची स्थिती : धोबी समाजातील ८०७ अहवालांचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, या कुटूंबातील २०२४ शिक्षण घेणा-या मुलांची संख्या विचारात घेता यापैकी फक्त १०६ मुले-मुली हे पदवी पर्यंत शिक्षण घेत असल्याचे निदर्शनास येते.

यावरून शैक्षणिकदृष्टया हा समाज तसा मागासलेला असल्याचे दिसून येते.

<u>वंश परंपरा व्यवसाय</u> : वंश परंपरेनुसार धोबी समाजातील व्यक्ती खालीलप्रमाणे व्यवसाय करतात.

| अ.क्र. | वंश परंपरेनुसार व्यवसाय | एकूण कुटूंबे | टक्केवारी. |
|---|---|---|---|
| १. | धोबी काम [कपडे धुणे] | ७९९ | ९७.९७% |
| २. | शेती व्यवसाय | ६ | १.०० |
| ३. | अन्य | २ | १.०० |

धोबी समाजातील लोक बहुतांशी गांवात राहतात. वंश परंपरागत व्यवसाय सोडून अन्य व्यवसायाकडे त्यांचा कल असल्याचे दिसून येत नाही. या समाजातील कुटूंबे ही प्रामुख्याने वंशपरंपरागत व्यवसायामध्ये असल्याचे निदर्शनास येते.

.....

# विवरणपत्र "ड"

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण कुटुंबे | पोलिस तक्रार होय | पोलिस तक्रार नाही | व्यसन दारू | व्यसन अन्य | व्यसन नाही | वस्ती गावात | वस्ती बाहेर | वस्ती सवर्ण | शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या. | शिक्षण माहिती प्राथ. | शिक्षण माहिती मा. | शिक्षण माहिती उ.मा. | शिक्षण माहिती पदवीधार | वंश परंपरा व्यवसाय धोबी | वंश परंपरा व्यवसाय शेती | वंश परंपरा व्यवसाय अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| १] | मुंबई विभाग | १३१ | .. | १३१ | ७५ | १७ | ३९ | १३० | .. | १ | ३४३ | १८२ | ९४ | ४७ | २० | १३१ | .. | .. |
| २] | पुणे विभाग | १३९ | .. | १३९ | ७० | ११ | ५८ | ९५ | १७ | २७ | ३०६ | १४७ | ८९ | ५० | २० | १३९ | .. | .. |
| ३] | नासिक विभाग | १०० | .. | १०० | ४४ | १० | ४६ | १०० | .. | .. | ३१२ | १२९ | १०७ | ५१ | २५ | ९२ | ६ | २ |
| ४] | औरंगाबाद विभाग | १८२ | २ | १८० | ८६ | २४ | ७२ | १३२ | २८ | २२ | ४६९ | २५२ | १४३ | ५६ | १८ | १८२ | .. | .. |
| ५] | नागपूर विभाग | १३४ | .. | १३४ | ७३ | १० | ५१ | ९० | ३१ | १३ | ३६० | १७९ | १०६ | ५९ | १६ | १३४ | .. | .. |
| ६] | अमरावती विभाग | १२१ | .. | १२१ | ६० | १० | ५१ | ९७ | २० | ४ | २३४ | ११८ | ६९ | ४० | ७ | १२१ | .. | .. |
| | एकूण | ८०७ | २ | ८०५ | ४०८ | ८२ | ३१७ | ६४४ | ९६ | ६७ | २०२४ | १००७ | ६०८ | ३०३ | १०६ | ७९९ | ६ | २ |

विवरणपत्र -इ.

## आर्थिक परिस्थिती व लग्न समारंभाबाबतची स्थिती.

विवरणपत्र"इ"नुसार सर्वेक्षणामध्ये असे दिसून येते की, धोबी समाजातील कुटूंबाची आर्थिक स्थिती ही अपेक्षेप्रमाणे समाधानकारक नाही. ते आर्थिक दृष्टया कमकुवत आहेत. अशा कुटूंबाची संख्या ६१९ असून, त्याची टक्केवारी ७३% येते तर आर्थिक परिस्थिती समाधानकारक असलेल्या कुटूंबाची संख्या १८८ असून त्याची टक्केवारी २३% आहे. यावरुन हा समाज आर्थिकदृष्टया कमकुवत आहे असे निदर्शनास येते.

### लग्न समारंभ :

कुटूंबातील लग्नसमारंभ व त्यामधील सामाजिक चालिरितीबाबत असे निदर्शनास येते की, धोबी समाज लग्न समारंभ उदा. लग्न ठरविणे हे कुटूंब प्रमुखामार्फत म्हणजे घरच्या मंडळीकडून व त्यांच्या संमतीने केली जाते असे सर्वेक्षणामधील ८०७ कुटूंबांमधून निदर्शनास आलेले आहे. हिंदू सवर्ण समाजातील व्यक्तींच्या मुलां-मुलींच्या लग्नसमारंभाप्रमाणेच धोबी समाजत लग्ने लावली जातात व हे लग्न ठरविण्याचे कामसुध्दा घरचीच वरिष्ठ मंडळी करतात असे निदर्शनास येते. यावरुन सवर्ण हिंदू समाजामध्ये असणा-या चालिरिती व परंपरा धोबी समाजामध्ये पाळल्या जातात असे दिसून येते.

.....

## विवरणपत्र "इ"

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण कुटुंबे | आर्थिक परिस्थिती समाधानकारक. | आर्थिक परिस्थिती असमाधानकारक | लग्न. घरची मंडळी | लग्न. मुले/मुली. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | मुंबई विभाग | १३१ | ४३ | ८८ | १३१ | -- |
| २. | पुणे विभाग | १३९ | ३५ | १०४ | १३९ | -- |
| ३. | नासिक विभाग | १०० | ४६ | ५४ | १०० | -- |
| ४. | औरंगाबाद विभाग | १८२ | ३६ | १४६ | १८२ | -- |
| ५. | नागपूर विभाग | १३४ | ५ | १२९ | १३४ | -- |
| ६. | अमरावती विभाग | १२१ | २३ | ९८ | १२१ | -- |
| | | ८०७ | १८८ | ६१९ | ८०७ | -- |

## पृथःकरण

महाराष्ट्र राज्यातील धोबी समाजाच्या विविध पोटजाती यांचा व्यवसाय, मंदिर प्रवेशाची स्थिती, शिक्षण व सामाजिक परंपरा यांचे विश्लेषण केले असता खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करता येईल.

महाराष्ट्रातील ६ विभागातील एकूण ८०७ कुटूंबाचे सर्वेक्षण केले असता एकूण हिंदू कुटूंबाची संख्या ७९६ तर मुस्लिम कुटूंबाची संख्या ही ११ आहे. धोबी समाजातील हिंदूंची कुटूंबे ही एकुण सर्वेक्षण केलेल्या कुटूंबांच्या ९८.६३% असून उर्वरित १.३७ % ही मुस्लिम जमातीची आहे. यावरुन असे सिध्द होते की, महाराष्ट्रात हिंदू धर्मीय धोबी समाजातील व्यक्ती यांची कुटूंबे अधिक आहेत. त्यामुळे समाजातील विविध जाती जसे धोबी, परीट, परदेशी, पडवळ, वठी, या सहा जातींमध्ये सर्व समाज विभागला गेला आहे.

धोबी जातीला पर्यायी जात परिट, लिंगायत व परदेशी अशा मानल्या गेल्या असून त्यांची एकूण टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एकूण कुटूंबे | टक्केवारी. |
|---|---|---|
| १. | ८०७ | १०० |
| २. | परीट- ७१५ | ८८.६ |
| ३. | लिंगायत ३४ | ४.२ |
| ४. | परदेशी ५८ | ७.२ |

अस्पृश्यतेसंदर्भात मागासवर्गीय जाती व सवर्ण यांमध्ये सामाजिक भेद असल्याचे वारंवार निदर्शनास येईल. यादृष्टीने अभ्यास केला असता, एकूण ८०७ कुटूंबापैकी ७३७ कुटूंबांनी सवर्ण व धोबी समाजातील कुटूंबे यामध्ये कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता पाळली जात नाही असे सर्वेक्षण अहवालामध्ये स्पष्ट केलेले आहे. यामध्ये अस्पृश्यता पाळली जात नाही असे म्हणणा-या कुटूंबांची एकूण टक्केवारी ९१.३२ येते. यावरुन सदर समाज हा सवर्णाचे सानिध्यात त्यांच्या पध्दतीप्रमाणे सामाजिक स्तरावर रहात असते हे मानण्यास वाव आहे.

नोकरी व्यवसायात व पारंपारिक व्यवसायात धोबी समाज [illegible] बरोबर आहे किंवा कसे या संबंधातील विश्लेषण केले असता, असे दिसते की, पारंपारिक व्यवसाय करणा-या कुटूंबाची संख्या ही

६८६ आहे. ही संख्या एकूण सर्वेक्षण झालेल्या ८०७ कुटूंबाच्या संख्येच्या तुलनेत पारंपारिक व्यवसाय करणाऱ्यांची टक्केवारी ८५ टक्के आहे. नोकरी करणाऱ्या कुटूंबाची संख्या ही ६६ असून त्याची टक्केवारी ८.१७ आहे व पारंपारिक व्यवसाय अगर नोकरी या व्यतिरिक्त अन्य व्यवसाय करणाऱ्या कुटूंबाची संख्या ही ५२ असून ही टक्केवारी [redacted] ६.४४ अशी आहे. यावरून समाजामध्ये राहून उपजिविकेचे साधन म्हणून पारंपारीक व्यवसायावर जीवन जगतात. धोबी समाजातील व्यक्तींमध्ये सामाजिक एकता व समाजातील विविध घटकांत वावरण्याची त्यांची प्रवृत्ती ही समाजाला पोषक आहे. सवर्णांच्या बरोबर सामाजिक रूढी, परंपरा यांचेशी संलग्न व समाजातील इतर व्यक्तींप्रमाणे त्यांचा दर्जा अबाधित आहे असे म्हणता येईल.

मंदीर प्रवेशाबाबत सर्वेक्षण झालेल्या ८०७ कुटूंबापैकी ७७७ कुटूंबांनी मंदीर प्रवेशा विषयी कोणत्याही प्रकारची अडवणूक होत नाही असे सांगितले. फक्त ३० कुटूंबांनी अडवणूक होते असे नूमद केले असले तरी ही बाब फक्त औरंगाबाद विभागातील १३ कुटूंबांनी, अमरावती विभागातील १७ कुटूंबाने नजरेस आणून दिलेले आहे. याबाबतच्या मागील माहितीचे अहवाल विचारात घेतला असता जिल्हा दक्षता समितीचे मंदिर प्रवेश व अस्पृश्यता या बाबींचा आढावा संबंधात अस्पृश्यता निर्मुलन, जिल्हा दक्षता समितीचे मासिक सभेत घेतले जाते. या सभेतील आढावा कार्यामध्ये धोबी समाजातील व्यक्तींच्या संदर्भात अस्पृश्यता पाळली जाते असे कुठेही निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे फक्त ३० कुटूंबांनी ही बाब निदर्शनास आणून देणे समर्थनीय नाही असे म्हणता येईल. म्हणजेच मंदीर प्रवेश करणाऱ्या कुटूंबाची टक्केवारी ही ९६.२८ टक्के आहे.

निष्कर्ष -

महाराष्ट्रातील धोबी" ही जात अस्पृश्य समजली जाते किंवा नाही या संदर्भातील निकर्ष खालीलप्रमाणे काढला जातो.

१] भारत सरकार राजपत्र एप्रिल १५, १९५० मधील पार्ट-२ सेक्शन ३ मध्ये मध्यप्रदेश सरकारने प्रकाशित केलेले आहे. त्यामध्ये धोबी ही जात तात्कालिन परिस्थितीमध्ये अनुसूचित जातीचे अनुषंगाने वेगवेगळया जिल्ह्यात मागासवर्गीय समजण्यात येत होती. परंतु महाराष्ट्रात ही जात विलिन झाल्यानंतर सदरची जात अनुसूचित जातीमध्ये अंतर्भूत झालेली नाही असे दिसून येईल.

विशेष कार्य अधिकारी [शिक्षण] विदर्भ विभाग, नागपूर यांचे परिपत्रक दि. ७ ऑक्टोबर १९५८ मध्ये शैक्षणिक सवलतीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इ. विदर्भातील जाती संदर्भात शासनाने ज्या शैक्षणिक सवलती प्रदान केलेल्या आहेत त्या संदर्भातील खुलासा बोलका आहे. त्यानुसार असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, मध्यप्रदेश सरकारने ज्या जातींना शैक्षणिक सवलती यापूर्वी दिलेल्या आहेत, त्या जातीच्या शैक्षणिक सवलती विदर्भ विभागातील महाराष्ट्रात विलिन झाल्यानंतर त्या संबंधित जातीच्या, संबंधित जिल्ह्यातील देण्यात येत असलेल्या शैक्षणिक सवलती व नोकरीतील सवलती महाराष्ट्र राज्यात अशाच प्रकारे पूर्ववत चालू रहातील असे नमूद केलेले आहे. विदर्भ विभागातील अशा जातींना एक स्वतंत्र संवर्ग देण्यात आलेला आहे त्यांना इतर मागासवर्गीय जाती असे समजण्यात आलेले आहे. या जातीमध्ये अपेंडिक्स "सी", जिल्हा बुलढाणा, भंडारा या जिल्ह्यात ही जात मागासवर्गीय दर्शविली आहे. परंतु सर्वेक्षणावरून असे दिसून येते की, ही जात संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेली आहे. परंतु सवर्णाप्रमाणेच समाजात त्यांचे वास्तव्य आहे. यावरून ही जात अनुसूचित जात नाही असे म्हणता येईल.

२] धोबी ही जात इतर मागासवर्गामध्ये समाविष्ठ आहे. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासलेल्या जाती या संवर्गात १२५ कलमाखाली या जातीचा उल्लेख आहे. प्राध्यापक आर. के. मुटाटकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीनेसुध्दा महाराष्ट्र राज्यात धोबी जातीबाबत अस्पृश्यता

पाळली जात नाही. धोबी जातीचे लोक हे महार, मांग, चांभार इ. पूर्वास्पृश्य व्यक्तींचे कपडे धूवत नाहीत असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे धोबी हा समाज अस्पृश्य आहे असे म्हणता येणार नाही.

३. मंदीर प्रवेश, व्यवसाय, वेगळी पंगत बसणे यांच्या सर्वेक्षणावरून असे दिसून येते की, धोबी हा समाज समाजामधील इतर जाती या सवर्गामधून सवर्णामध्ये समाविष्ठ झालेला असून वेगळ्या प्रकारची पंगत अथवा वेगळ्या प्रकारची वागणूक त्यांना दिली जात नाही. त्यामुळे धोबी हा समाज अस्पृश्य या सदराखाली येवू शकत नाही.

४. धोबी समाजाची आर्थिक परिस्थिती ही अपेक्षेप्रमाणे समाधानकारक नाही. समाज गरीब आहे. गरीब असलेल्या समाजाची टक्केवारी ही ७६.७० असून, ते उपजिविकेचे साधन म्हणून ते त्यांचा पारंपारिक व्यवसाय करतात.

५. पोलिस तक्रारीचे बाबत कोणत्याहीप्रकारची भांडणे त्यांच्यामध्ये जवळ जवळ नाहीतच. त्यामुळे हा समाज काही अंशी सुशिक्षित झाला आहे असे म्हणता येईल.

६. धोबी समाजातील कुटूंबे ही गांवात रहातात. गावांत राहणा-या कुटूंबाची टक्केवारी ही ७९.८० आहे व गांवाचे बाहेर सवर्णांच्या वस्तीशी लागून असलेल्या घरांमध्ये रहाणा-या कुटूंबाची संख्या ही २०.२४ आहे. यावरून असे दिसून येते की, हा समाज मुलत: गांवामध्ये निवासासाठी रहात असलेल्या सवर्णांच्या समाजामध्ये संलग्न झालेला आहे. यांचेशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव सवर्ण करीत नाही. यावरून धोबी हा समाज अस्पृश्य आहे असे म्हणता येणार नाही.

७. धोबी समाजातील कुटूंबाच्या सर्वेक्षणामध्ये सदरचा समाज हा शैक्षणिकदृष्टया व आर्थिकदृष्टया अत्यंत मागासलेला असल्याचे दिसून येते. या समाजातील चालिरिती, रुढी व परंपरा ह्या सवर्ण हिंदू प्रमाणेच असल्याचे निदर्शनास येते.

[ रामदास पाटील ]
संचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण,
संस्था, पुणे.

महाराष्ट्र राज्यातील "धोबी" जातीला अनुसुचित जातीच्या सवलती मिळण्याबाबत करावयाचे सर्वेक्षण कार्य-

सर्वेक्षण अहवाल दिनांक. -----

स्थळ-

१. मुलाखत देणाऱ्या व्यक्तींचे नाव :- वय -- जात ----
पोटजात शिक्षण -----
मातृभाषा ----

२ मुलाखत देणा-या व्यक्तीचा व्यवसाय :- धंदा
कार्यालयात नौकरी
जोडधंदा

३. आपली जात ही कोणत्या विभागात उपलब्ध आहे. :- विदर्भ/मराठवाडा/कोकण/ मुंबई/नासिक व पुणे

४. "धोबी" या जातीचा उल्लेख पर्याय जातीमध्ये करावयाचा झाल्यास ही पर्यायी जात कोणती ? :- परीट/ लिंगायत धोबी/ परदेशी धोबी

५. आपल्या गावात/मोहल्ला/वाडीत प्रामुख्याने किती कुंटूबे राहतात [धोबी समाजाची] :- गांव --- मोहल्ला -----
तालुका -----
कुंटूबे राहतात ----------

६. आपल्या समाजात अस्पृश्यता पाळली जाते काय ? :- होय / नाही.

७. अस्पृश्य व स्पृश्य असा भेदभाव पाळण्यात येत असल्यास नाहसं अस्पृश्यता निर्मूलन कायद्याअन्वये गुन्हे नोंदविण्यात आलेत काय? :- होय / नाही.

८. असे गुन्हे नोंदविण्यात आले असल्यास त्याचे स्वरुप /कारण कोणते ? :-
अ. जातीविषयक शिविगाळ
ब. मंदीर प्रवेश
क. सवर्णाच्या येथील गृहप्रवेश
ड. सवर्णाच्या सामाजिक कार्यास सहभाग
इ. पाणी भरणे
फ. सत्यनारायण पुजा
ज. धार्मिककार्यात सहभाग...

९. या गुन्ह्यात कीती प्रकरणात शिक्षा झाली आहे ? :- प्रकरणात शिक्षा झाली/प्रकरणात शिक्षा झाली नाही.

१०. धोबी समाजाच्या लोकांना मंदीरात मुक्त प्रवेश आहे काय ? :- होय / नाही.

...२...

११. अस्पृश्य म्हणून अस्पृश्यतेच्या कारणावरुन काही निर्बंध लादण्यात आले काय ? :- होय / नाही.

१२. असल्यास निर्बंधाचे स्वरुप कोणते :- ------------

१३. गावात/शहरात आपल्या समाजाच्या जातीच्या लोकांची वस्ती सवर्णांच्या वसतीत/गावाचे एका टोकास यापैकी कोणत्या ठिकाणी आहे ? :- गावामध्ये/ गावाबाहेर

सर्वणाचे वस्तीत, निवास व्यवस्था आहे.

१४. आपल्या कुटुबातील शिक्षण घेतलेल्या मुला / मुलीची संख्या किंती ? :- अ. प्राथमिक,
ब. माध्यमिक
क. उच्च माध्यमिक
ड. पदविधर/ पदविका

१५. शिक्षण घेतांना आपल्या कुटूंगातील मुला मुलींना फी माफी मिळाली आहे काय ? :- होय / नाही.

१६. वंशपरंपरेनुसार आपला व्यवसाय कोणता आहे ? :- ------------

१७. वंशपरंपरेचा व्यवसाय सोडून इतर दुसरा अन्य व्यवसाय उपजिविकेसाठी निवडला काय ? असल्यास व्यवसाय कोणता ? :- होय / नाही.

व्यवसाय-

१८. आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे काय ? :- होय / नाही.

सर्वसाधारण

१९. आपली मुख्य धर्म कोणता ? :- धर्म

२०. लग्नसमारंभ ठरविण्याच्या कोणत्या पध्दती आहेत ? लग्न समारंभाचा एकूण अंदाजे खर्च किंती येतो :- अ. घरची वरिष्ठ मंडळी ठरवितात
ब. मुलगा/ मुलगी हे ठरवितात.
रुपये ------- अंदाजे खर्च येतो

२१. सदरच्या जातीमधील प्रमुखास काय म्हणतात ? :- पंचकमेटी प्रमुख/ जाती प्रमुख

२२. त्यास कोणते अधिकारी आहेत ? :- ------------------------

२३ सदरच्या व्यक्ती ह्या अनुवांशीकतेने पदावर आल्यास काय ? किंवा त्यांची निवड केली जाते ? :- ------------------

| | |
|---|---|
| २४. सदरच्या जातीमध्ये कोणते व्यसन आहे जसे अफु, भांग, गांजा, दारु अफिम. इत्यादीं. | --- |
| २५. जातीचे नांवार इतर जातीच्या व्यक्तीशी भांडण झाले असल्यास त्यांची तक्रार पोलीस स्टेशनला नोदविण्यात आली काय ? | होय / नाही. |
| २६. मृत्यू झालेल्या व्यक्तीचे मृत शरिराची व्हीलेवाट कशी लावतात ? | दफन विधी/ मृत शरीर जाळणे |
| २७. मृत्यू झाल्यानंतर सुतकाळ संपतांना कुटूंबातील व्यक्तीचे कपडे धुण्याकरीता बाहेरील व्यक्तींना बोलविण्यात येते काय ? | होय / नाही.<br><br>कपडे इतर समाजाप्रमाणे घरीत धुतात... |
| २८. इतर संवर्णाच्यायेथील धार्मिक कार्य-लग्नसमारंभ अथवा इतर सामुहिक कार्याचे प्रसंगी जेवतांना आपल्या समाजातील व्यक्तींना जेवण वाढतांना वेगळ्या पगंतीत बसवितात काय ? | होय / नाही. |
| २९. सर्वेक्षण करणा-या अधिका-याचे एकत्रित अभिप्राय .. | ---- |

दिनांक.

सर्वेक्षण अधिका-याचे नांव
व पदनाम...